# MARATHI (109)
# SAMPLE PAPER (2018-19)

**STD- XII** **Marks-100**

## विभाग — अ

प्र.१. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

मानवाला अवास्तव व कल्पनेपलीकडील गोष्टींची नेहमीच ओढ लागून राहिली आहे. त्या आकर्षणामुळेच अनेकदा मनुष्य जी गोष्ट मिळविणे कधी शक्यच नाही अशा गोष्टी प्राप्त करण्याचे स्वप्न पाहू लागतो. याचा परिणाम म्हणजे असे ध्येय कधी साध्य तर होतच नाही, परंतु प्रचंड नैराश्य मात्र अशा लोकांना घेरून टाकते. म्हणूनच जे ध्येय वास्तवात आहे व जे मिळविण्यासारखे आहे, असेच ध्येय ठेवावे. वर्षाच्या शेवटी वार्षिक परीक्षा होणार हे ठरलेलेच असते. त्यामुळे वर्षभराचे नियोजन करून टप्प्याटप्प्यावर स्वत:च्या क्षमता तपासून, सुधारणा करून वार्षिक परीक्षा आत्मविश्वासाने देता येते. वार्षिक परीक्षेत उत्तम गुण मिळविण्याचे ध्येय गाठता येते. वार्षिक परीक्षेचा कालावधी समोर असल्यामुळे नियोजन व प्रयत्नांची योग्य सांगड घालता येते.

रोजचा अभ्यास, आठवडयाचा अभ्यास, महिन्याचा अभ्यास, वर्षाचा अभ्यास असे वेळेचे बंधन घालून टप्प्याटप्प्याने केलेला अभ्यास निश्चितच आपल्याला ध्येयपूर्तीकडे घेऊन जातो. जे विद्यार्थी वेळेचे बंधन पाळत नाहीत, त्यांना मात्र परीक्षा तोंडावर आल्यावर प्रचंड पळापळ करावी लागते. नोट्स अपूर्ण असतात, उजळणी झालेली नसते, पुस्तकातील काही भाग समजलेलाच नसतो, लेखनाचा सराव अपूर्ण असतो.

अशा अपूर्णतेच्या चक्रव्यूहात ते अडकतात व अपयश पदरी येते. ध्येयाला वेळेचे बंधन असायलाच हवे.

इतरांचे बघून, इतरांनी सांगितलेले ध्येय ठरविले तर ते साध्य होईलच आणि टिकेलचं याची खात्री नाही. कारण ते तुमच्या अंत:करणात प्रकटलेले नसल्यामुळे असे ध्येय गाठण्यासाठीची अंत:प्रेरणा तुमच्या मनात निर्माण होणार नाही. इतरांशी तुलना करून ध्येय ठरविलेले नसावे, ते आपण आपले ठरवावे. अर्थात आपल्या क्षमतानुसार व आवडीनुसार ठरवावे. आपल्या मित्रांनी ठरविलेले त्यांचे ध्येय हे

त्यांच्या इच्छेतून, त्यांच्या क्षमतांनुसार व त्यांच्या परिस्थितीनुसार ठरविलेले असेल. त्यामुळे ते ध्येय 'तुमचे ध्येय' होऊ शकत नाही.

काही विद्यार्थी जगातल्या एखाद्या यशस्वी व्यक्तीच्या ध्येयावरून स्वत:चे ध्येय ठरवतात. मित्र किंवा मैत्रीण इंजिनिअरिंगला गेले म्हणजे आपणही जायलाच हवे असे नाही. हे ध्येय निवडताना वरील सर्व बाबींचा विचार केला असेल व मनापासून तुम्हाला वाटत असेल तर असे ध्येय निवडण्यास हरकत नाही परंतु एखादे यशस्वी व्यक्तीचे आत्मचरित्र वाचून, चित्रपटात बघून, प्रत्यक्ष भेटून, तात्पुरते प्रभावित होऊन जर ध्येय ठरविले तर अपयश येण्याचीच शक्यता अधिक. कारण तो तात्पुरता प्रभाव ओसरताच तुमचा उत्साहसुद्धा मावळून जाईल व जो वेळ तुम्ही आतापर्यंत खर्च केला असेल तो वाया जाईल. जे श्रम तुम्ही केले असतील त्याचे काय? शिवाय अपयशाचे जे इतर तोटे होतील ते वेगळेच.

स्वत:ला मनापासून काय वाटते, आपली गरज काय आहे, आपल्यात क्षमता किती आहे, साधनांची किती उपलब्धता आहे, वेळ किती आहे हे सर्व पडताळून तुम्ही तुमचे स्वत:चे ध्येय स्वत: ठरवा.

— अभ्यास मित्र

प्रश्न : १. आयुष्यात स्वत:चे ध्येय नसेल तर काय होईल ? (३)

२. ध्येयनिश्चितीचे फायदे स्वत:च्या भाषेत लिहा. (३)

३. अवास्तव व कल्पनेपलीकडील गोष्टींच्या ओढीमुळे काय होते, स्पष्ट करा. (२)

४. ध्येयाला वेळेचे बंधन का असावे ? (१)

अ. अपूर्णतेच्या चक्रव्यूहातून बाहेर पडण्यासाठी

ब. अपयश पदरी पडण्यासाठी

क. वेळेत अडकण्यासाठी

ड. यांपैकी नाही.

५.    वेळेचे बंधन घालून टप्प्याटप्प्याने केलेला अभ्यास निश्चितच आपल्याला ________घेऊन जातो.

(१)

अ.ध्येयपूर्तीकडे    ब. अपयशाकडे    क. माणुसकीकडे

## विभाग — ब

प्र.२. खाली दिलेल्या विषयांपैकी **एका विषयावर** निबंध लिहा. (१५)

१. समाज घडवण्यात युवकांची जबाबदारी
२. नको त्या परीक्षा....
३. शेतक—याचे आत्मवृत्त

## विभाग — क

प्र.३.अ. खालीलपैकी कोणत्याही पाच विधानांमध्ये कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून वाक्य पुन्हा लिहा. (१५)

१– आमचे शरीर सुदृढ व्हावे. आम्ही योगासने करतो. ( मिश्र वाक्य करा )
२– आज गाडीत कोण गर्दी ! ( विधानार्थी वाक्य करा )
३– ठसा उमटविणे या वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (वाक्प्रचाराचा अर्थ वापरुन वाक्य पुन्हा लिहा )
४–दादासाहेबांनी सुताराकडून एक छान झोपाळा तयार केला. त्याची बागेत स्थापना केली.

(केवलवाक्य करा )

५. तुझ्या भेटीने खूप आनंद झाला. (**उद्गारार्थी वाक्य करा.)**

६. आईने रागावताच मुलाने आपली चूक कबूल केली.
( डोळे वटारणे या वाक्प्रचाराचा वापर करून वाक्य तयार करा. )
७.आई स्वयंपाक करत होती. कुणीतरी बेल वाजवली. (संयुक्त वाक्य करा )

ब. खालील शब्दांचे **वचन बदलून** लिहा. (२)

१. चौथरा    २. घोडा

क. खालील शब्दांचा क्रियाविशेषणासारखा **<u>अर्थपूर्ण वाक्यात</u>** उपयोग करा. (३)

१. चांगले २. अनेकदा ३. वारंवार

ड. खालील वाक्ये सूचनेप्रमाणे सोडवा. **(कोणतेही ५)** (५)

१ रस्त्यावरून जाताना सावकाश चालावे.
**(क्रियाविशेषण अव्यय ओळखा )**

२ सूर्य ढगामागे लपला. **( शब्दयोगी अव्यय ओळखा )**

३ आईने मंडईतून कांदे व बटाटे आणले. **(उभयान्वयी अव्यय )**

४ गुरूजी विद्यार्थ्यांना व्याकरण शिकवतात. **(क्रियापद ओळखा)**

५ चौपट मूले असूनही काम निट झाले नाही. **(विशेषण ओळखा)**

६ आता आपण अध्यक्षस्थानाचा स्वीकार करावा. **(सर्वनाम ओळखा)**

७ तात्यासाहेबांच्या स्वभावातील चांगुलपणा सर्वांनाच भावतो.**(भाववाचक नाम ओळखा)**

## विभाग — ड

प्र.४. अ. खालील प्रश्नांची उत्तरे गद्यपाठाच्या आधारे प्रत्येकी सुमारे **८० शब्दांत** लिहा. **(कोणतेही २)** (१०)

१. उन्नीकृष्णन यांचे आभार आपण मानायला हवेत, असे लेखक श्री.अविनाश हळबे यांना का वाटले?
२. यंत्रमानव सांगकाम्या आहे, हे ‘अति काळजीचे परिणाम‘ या पाठाच्या आधारे उदाहरण देउन स्पष्ट करा.
३. ‘आणि कैदेत‘ या पाठाच्या आधारे चिनी शिपायांनी लेखकास अटक केली त्या प्रसंगाचे वर्णन स्वत:च्या भाषेत करा.

ब. खालील वाक्यांचे पाठाधारे **<u>संदर्भासह स्पष्टीकरण</u>** करा. **(कोणतेही २)** (१०)

१. आई—वडील आणि प्राथमिक शिक्षक हे मुलांसमोरचे आदर्श होऊ शकतात.
२. हिरीच्या आईमुळं मी त्या घराला बांधली गेले.
३. लाखात एखाद्याच्या ललाटी नंदनवनाची प्राप्ती कोरलेली असते.

क. पद्यपाठांच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **<u>८० शब्दांत</u>** लिहा.**(कोणतेही २)** (१०)

१. ‘बहरतील मळे‘ या कवितेत कवींनी कोणता आशावाद व्यक्त केला आहे ?
२. संत नामदेवांचा प्रपंचाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा व्यक्त झाला आहे ?
३. कवयित्री शांता शेळके यांच्या लेखनातून राबणाऱ्या स्त्रीचे वर्णन विविध प्रतिमांतून कसे आले आहे, ते स्पष्ट करा.

ड. खालील काव्यपंक्तींचे **<u>संदर्भासह स्पष्टीकरण</u>** करा. **(कोणतेही – २)** (५)

१. या जन्माला फुटे न भाषा, निदान पुढच्या फुटेल का ती ?
२. एक प्रतिज्ञा, विजय मिळेतो राहिल रण हे धगधगते.
३. सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतो ।। मनुजा सांगतो।। जोती म्हणे ।।

इ. खालील प्रश्नाचे उत्तर **सविस्तर लिहा.** (कोणताही – १) (१०)

१. दहावीची (अ) पूर्वतयारी या पाठात अतिशयोक्तीचे कोणकोणते प्रसंग सांगितले आहेत?
२. ‘चाफा‘ या विडंबन काव्यात धोत–याने स्वत: चाफा आहोत, हे भासवण्यासाठी काय–काय केले ?

ई. खालील प्रश्नांची दिलेल्या पर्यायांमधून **<u>योग्य पर्याय निवडून</u>** उत्तरे लिहा. (५)

१. इंटरनेटला मराठीत काय म्हणतात ?
अ. मायाजाल ब. बाह्यजाल क. महाजाल ड. मोहजाल
२. भेट गाठ, बोलाचाली, विचारपूस हे .......... या शब्दाचे शब्दकोशात दिलेले अर्थ आहेत.
अ. बातमी ब. प्रक्षेपण क. मुलाखत ड. जाहिरात
३. दूरदर्शनचे ब्रीदवाकय कोणते ?
अ. उघडा डोळे बघा निट ब. सबसे तेज.....
क. सत्यम शिवम सुंदरम ड. मी मराठी
४. आकाशवाणीवरून प्रसारित होणा–या कार्यक्रमांच्या क्रमवार यादीला काय म्हणतात ?
अ. ब्ल्यूप्रींट ब. चार्जशीट क. ब्रेकिंग न्यूज ड. क्यूशीट
५. बाळशास्त्री जांभेकर यांच्या वर्तमानपत्राचे नाव सांगा.
अ. दर्पण ब. सुधारक क. रणशिंग ड. सकाळ